**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटसॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २९६ वा | बुधवार, दि. ०९ जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# भारत बंद! २५ कोटी कर्मचारी जाणार संपावर

## जीवनावश्यक सेवांवर होणार परिणाम?

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** भारतातील बँक, पोस्ट ऑफिस, वाहतूक सारख्या सरकारी क्षेत्रातील २५ कोटींहून अधिक कर्मचाऱ्यांनी बुधवारी भारत बंदची हाक दिली आहे. भारतातील ट्रेड युनियनमधील कर्मचाऱ्यांनी भारत बंदची घोषणा केली आहे. देशातील १० राष्ट्रीय पातळीवरील ट्रेड युनियनने एकत्रितरित्या 'कामगारविरोधी, शेतकरी विरोधी आणि कॉर्पोरेट समर्थक धोरणाच्या विरोधात बंदचं हत्यार उपसलं आहे.

'भारत बंद'मुळे बँकिग क्षेत्र, जीवन विमा, पोस्ट ऑफिस सेवा, कोळसा खाणकाम, परिवहन आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगासहित इतर प्रमुख क्षेत्रांना मोठा फटका बसणार आहे. हिंद मजदूर सभाचे हरभजन सिंह सिद्धू यांनी सांगितलं की, 'बँकिंग, पोस्ट ऑफिस, खाणकाम, कारखाने आणि राज्य परिवहन सेवांवर परिणाम होणार आहे'. या 'भारत बंद'मध्ये AITUC, CITU, HMS, INTUC, SEWA आणि इतर युनियन सहभागी होणार आहेत. 'एटक'चे अमरजीत कौर यांनी सांगितलं की, '२५ कोटींहून अधिक कामगार भारत बंदमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. तसेच या भारत बंदमध्ये शेतकरी आणि ग्रामीण भागातील मजूर देखील सामील होण्याची शक्यता आहे'.

भारतातील २५ कोटींहून अधिक कर्मचारी १० राष्ट्रीय पातळीवरील ट्रेड युनियनने पुकारलेल्या भारत बंदमध्ये सहभागी होणार आहेत. सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणांचा विरोध करण्यासाठी ट्रेड युनियनने बंद पुकारला आहे. या भारत बंदमुळे भारतातील प्रमुख क्षेत्रांना फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



**कोणत्या सेवांवर होणार परिणाम?**

भारत बंदची हाक देण्यात आल्यामुळे बँकिंग सुविधा, पोस्ट सेवा, कोळसा खाणीतील कामं, राज्य परिवहन, कारखाने आणि इतर काही जीवनावश्यक सेवा प्रभावित होतील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. हिंद मजदूर सभेचे हरभजन सिंग सिद्धू यांच्या माहितीनुसार देशभरातील सेवा या संपामुळं कमीजास्त प्रमाणात प्रभावित असतील.

**कामगार संघटनांची मागणी काय?**

» मागील 10 वर्षांपासून सरकारनं वार्षित श्रम संमेलनाचं आयोजन केलेलं नाही.

» चार नव्या श्रम संहिता लागू करून सरकारनं कामगार, श्रमिकवर्गाचे अधिकार आणखी कमकुवत केले आहेत.

» सामूहित सौदेबाजी, आंदोलनाचे अधिकार आणि कामगार कायद्यांचं उल्लंघन गुन्हेपात्र ठरवणाऱ्या सरकारी भूमिका श्रमिकांसाठी घातक आहेत.

» नोकऱ्यांची कमतरता, महागाई, मजुरीच्या दरातील घट आणि अशा अनेक मुद्द्यांवर ही संपाची हाक देण्यात आली आहे.

**संपात कोणाचा सहभाग?**

ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या अमरजीत कौर यांच्या माहितीनुसार या संपामध्ये 25 कोटींहून अधिक कर्मचाऱ्यांचा सहभाग असणाऱ्या शक्यता असून, शेतकरी आणि श्रमिक वगार्चाही या संपात सहभाग असेल. याशिवाय एनएमडीसी लिमिटेड, खनिज आणि इस्पात कंपन्या, राज्य शासनासह सार्वजनिक क्षेत्र आणि उपक्रमांसाठी कार्यरत असणारे कर्मचाऱ्यांना या संपात सहभागी होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय संपाला संयुक्त शेतकरी मोर्चा आणि कृषी कामगार संघटनांनीसुद्धा पाठिंबा दिल्यामुळं हा संप मोठ्या स्तरावर पार पडेल असं म्हटलं जात आहे.

याआधी कामगार संघटनांनी 26 नोव्हेंबर 2020, 28-29 मार्च 2022 आणि 16 फेब्रुवारी 2024 मध्येसुद्धा अशाच देशव्यापी संपांची हाक दिली होती. दरम्यान, 9 जुलै रोजी नियोजित संप हा फक्त एक प्रदर्शन नसून, श्रमिकांच्या हक्कांचा प्रश्न असून हा संप यशस्वी कसा ठरेल हाच कामगार संघटनांचा प्रयत्न असेल.

## सोलापूर जिल्ह्यातील पीक विम्याची ८२ कोटींची थकीत रक्कम ५ दिवसात मिळणार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पावसाळी अधिवेशनात आज सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीकविमा आणि नुकसानभरपाई संदभार्तील प्रश्नावर आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी आवाज उठवला. सोलापूर जिल्ह्यातील ७३ हजार ७१८ शेतकऱ्यांची सुमारे ८१ कोटी ८० लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळालेली नाही परिणामी हजारो शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.त्यामुळे ही रक्कम तातडीने वितरित करावी. तसेच,शेतकऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणासाठी गट व तालुका पातळीवर तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करावी,जेणेकरून स्थानिक पातळीवरच तक्रारींचा जलद निपटारा होईल.

मोहिते पाटील यांनी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर एक टोल-फ्री क्रमांक सुरू करण्याची मागणी केली.त्याचबरोबर, विविध विमा कंपन्यांकडून मिळणाऱ्या तक्रारींचे एकत्रीकरण करून एकत्रित डिजिटल यंत्रणा निर्माण करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना कोणत्या कंपनीने किती मोबदला दिला, याची पारदर्शक माहिती मिळू शकेल अशी यंत्रणा निर्माण करण्याची मागणी केली.

या मुद्द्यांवर उत्तर देताना मंत्री आशिष जयस्वाल यांनी उत्तर देताना सांगितले की, २० जून २०२५ अखेर सोलापूर जिल्ह्यात एकूण २ लाख ३२ हजार ८५१ अर्जदार शेतकऱ्यांची नुकसानभरपाई २७८.७१ कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे.त्यात स्थानिक व व्यापक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत १ लाख ५९ हजार ६९९ शेतकऱ्यांना १९७.



६३ कोटी रुपये भरपाई वितरित करण्यात आली आहे. तर काढणी पश्चात नुकसान व उत्पादनातील घट यासाठी ६९,९५४ शेतकऱ्यांसाठी ८१.८० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात लवकर जमा होण्यासाठी विमा कंपन्यांना राज्य सरकारकडून विमा हप्ता अनुदान वितरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून ४ ते ५ दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होणार असल्याचे सांगितले.

मोहिते पाटील यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणासाठी गट व तालुका पातळीवर तक्रार निवारण यंत्रणा व विमा कंपन्या आणि कृषी विभागाचे संकेतस्थळ यांचे एकत्रीकरण करून एकत्रित डिजिटल यंत्रणा निर्माण करण्याच्या मुद्यावर शासन सकारात्मक निर्णय घेईल जेणेकरून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या उपाययोजनांची अंमलबजावणी तातडीने होईल असे आश्वासित केले आहे.आ मोहिते पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विधिमंडळात आवाज उठवल्याने पिकविम्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांतून त्यांच्याप्रती आभाराची भावना व्यक्त होत आहे.

## संदीप पाटील यांच्या 'रजनी गंधा' कार्यक्रमाने रंगली सांस्कृतिक मैफल

### अन्नछत्र मंडळ वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३८ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, मंगळवारी स्वामिनी प्रस्तुत ह्यरजनी गंधाह्ल सादरकर्ते- संदीप पाटील व सहकारी पुणे ह्या कार्यक्रमाने ९ वे पुष्प संपन्न झाले. या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. या कार्यक्रमास श्रोत्यांनी प्रचंड गर्दी केलेली होती. भक्तीगीते-भावगीते, चित्रपटगीते अशा एक ना अनेक मराठी व हिंदी गानी ख्यातनाम गायक संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'रजनी गंधा' मध्ये सादर केले. या कार्यक्रमास श्रोत्यांनी प्रचंड दाद दिली. सोलापूर चे ख्यातनाम गायक महंमद आयाज यांनी देखील सदर कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

दरम्यान या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन जिल्हा सरकारी वकील अँड. प्रदीपसिंह रजपूत, जेष्ठ पत्रकार राकेश टोळ्ळे, संजीवकुमार, झोनल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, सोलापूर, आदिय कुमार सिंग, किरण कुमार, अँड. विजय हर्डीकर, विधीज्ञ, अक्कलकोट, उद्योगपती राजकुमार सुरवसे, सागर सोनटक्के सोलापूर, सचिन चव्हाण कोल्हापूर, शैलेश पिसे, जयंत सुभेदार अक्कलकोट, दीपक खैराटकर, डॉ. संतोष मेहता, राजेंद्र मायनाळ अध्यक्ष बसव सेंटर, सतीश भूमकर पुणे, विश्वास कुलकर्णी सोलापूर, बाबुशा महिंद्रकर अक्कलकोट, श्रीमती शिला इंगळे मुंबई, श्रीमती छाया मोदगी-कुलकर्णी नाशिक, श्रीमती नंदिनी पाटील दामनगांव, श्रीमती शकुंतला भोसले सोलापूर, श्रीमती चारुशीला भोसले मुरुड, इस्रो चे शास्त्रज्ञ सचिन खमितकर, राज राठोड सोलापूर, किरण पाटील, स्थापत्य अभियंता, तम्मामामा शेळके सामाजिक कार्यकर्ते, अभिनंदन गांधी, व्यावसायिक, अक्कलकोट, अकिल बागवान, सिद्धेश्वर मोरे, उद्योजक, वळसंग, श्रीमती सरोज मशीलकर, यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते - संदीप पाटील सह पत्नीक, ख्यातनाम गायक महंमद आयाज व सहकारी यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे पुरोहित सोमकांत व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. उद्योजक बसवराज तथा पिंटू दोडमनी यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, अनुयाताई फुगे-पाटील, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, क्रांती वाकडे, अनिता गडदे, रोहिणी देशपांडे, धनश्री पाटील, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, व न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, विश्वस्त- भाऊ कापसे, संदीप फुगे-पाटील, लक्ष्मण पाटील, रामचंद्रराव घाटगे, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, मनोज निकम, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, मैनुद्दीन कोरबू, अश्पाक काझी, सर्फराज शेख, प्रवीण देशमुख, स्वामिनाथ गुरव, ओंकारेश्वर उटगे, अँड. संतोष खोबरे, रोहित खोबरे, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, सौरभ मोरे, राजु नवले, शितल जाधव, अनिकेत सोनटक्के, बालाजी पाटील, निखील पाटील, रोहन शिर्के, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, कुमार सलबत्ते, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, उमेश येळसंगी, आकाश शिंदे, यश विभूते, विराज माणिकशेट्टी, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, प्रसाद मोरे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार,रमेश हेगडे, तानाजी पाटील, राजू पवार, आकाश सूर्यवंशी, शुभम सावंत, सुनील कटारे, श्रीशैल रोडगे, चन्नप्पा मडीखांबे, प्रमोद पाटील, सुभाष गडसिंग, महेश दणके, समर्थ यादव, प्रा. मोदी, अतुल जाधव, लक्ष्मण विभूते, प्रीतेश किलजे, समर्थ घाडगे, विनायक भोसले, भरत राजेगावकर, मल्लिकार्जुन बिराजदार, प्रा. शरणप्पा आचलेर, प्रा. मनोज जगताप, प्रा. प्रकाश सुरवसे, प्रशांत साठे, स्वामिनाथ बाबर, गोविंदराव शिंदे, ज्ञानेश्वर भोसले, समर्थ चव्हाण, सुमित कल्याणी, राहुल इंडे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल व मंडप सजावट कल्लप्पा छकडे यांनी केले.

**गुणीजन गौरव :** श्री नागेंद्र पंचय्या हिरेमठ,(रुग्णवाहिका चालक) वैद्यकीय सेवा, श्री रामलिंग स्वामी, (आरोग्य निरीक्षक, हसापुर) वैद्यकीय सेवा, श्री कांतीलाल कल्याणराव जाधव, पोस्टल असिस्टंट, पोस्ट ऑफिस, अक्कलकोट, पोलीस कॉन्स्टेबल अश्विनी इंद्रजीत बाभळसुरे दक्षिण पोलीस ठाणे, अक्कलकोट यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव :** तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ८ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.

शुक्रवार दि. ९ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्री ९.३० पर्यंत श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, निपाणी प्रस्तुत, 'सूर भक्तीचे उमटले' भक्ती संगीत हा कार्यक्रम सादर होणार आहे.

## श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशनच्या वतीने २५० विद्यार्थ्यांना मोफत वहया वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुर शहर व पुर्व भागातील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलैले व नावाजलैली सामाजिक संस्था म्हणुन ओळख असलेली श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशन च्या वतीने जवळपास 250 विद्यार्थ्यांना "मोफत वहया वाटप" क्रार्यक्रम अतिशय उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यंदाचे वर्ष है फाउंडेशन चा सामाजिक कार्याचा सलग 13 व्या वर्ष आहै.

श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशन च्या वतीने आयोजित क्रार्यक्रमास सोलापुर शहरातील प्रसिद्ध असलेले डॉ. श्रीकांत माकम, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, सोलापुर संजीवनी हॉस्पिटल चे सचिव दत्ता अण्णा शिंदे, कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था खजिनदार व श्री नीलकंठेश्वर शिक्षण संस्था संचालक श्रीनिवास बंदगी, विश्वस्त नागेश टंकसाळ, फाउंडेशन चे सल्लागार शंकर बटगिरी, माजी विश्वस्त अंबादास नादरगी, समाज बांधव आनंद रेब्बा,व फाउंडेशन चे प्रेसिंडेट सुनिल धूळम, अध्यक्ष लखन रुमांडला, सचिव लखन मिठ्ठा, युवराज सरवदे यांचा प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी डॉ. श्रीकांत माकम यांनी मनोगत व्यक्त करुन उपस्थित असलेले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच, फाउंडेशन च्या सामाजिक कार्याची कौतुक करुन शुभेच्छा दिली. यावैळी श्रीनिवास बंदगी, अंबादास नादरगी व नागेश टंकसाल यांनी मनोगत व्यक्त केलै.

या क्रार्यक्रमाचे सुत्रसंचालन शंकर बटगिरी यांनी केले आहे तर, प्रस्तावना श्रिनिवास बंदगी यांनी केले. शेवटी प्रेसिंडेट सुनिल धूळम यांनी सर्वाचे आभार मानले.

या क्रार्यक्रमास फाउंडेशन चे श्रिनिवास कामुर्ती, रमेश म्हंताटी, अनिल आरकेल, सत्यनारायण दोड्डी, विनित धूळम, नरसिंग म्हंता, ज्ञानेश्वर रेब्बा, कार्तिक चिकनी व इतर सभासद उपस्थित होते.


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकारतज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )

२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13



**निरामय पॅरालिसिस सेंटर**

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर

निरामय पॅरालिसिस सेंटर

प्रत्येक जिल्ह्यात फ्रेंचाइजी देणे आहे

फ्रेंचाइजी का घ्यावी?

- No Royalty.
- कमीत कमी Operating Cost.
- तुलनेने सर्वाधीक नफा मिळेल.
- अनुभवी डॉक्टर
- अनुभवी स्टाफ
- कमीत कमी गुंतवणुक

फ्रेंचाइजी साठी आजच संपर्क करा

9503310568


## शालेय विद्यार्थ्यांसाठी एसटीच्या फेऱ्या रद्द करू नयेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दररोज लाखो विद्यार्थी बसने शाळा, महाविद्यालयात ये-जा करतात. त्यांच्यासाठी हजारो फेऱ्या सुरू आहेत. परंतु, विविध कारणांनी काही फेऱ्या अचानक रद्द केल्या जातात, अशा तक्रारी विद्यार्थी व पालकांकडून येत आहेत.

विशेषतः आदिवासी पाडे आणि दुर्गम भागात विद्यार्थ्यांना एकच बसफेरी उपलब्ध असल्याने त्यांची प्रचंड गैरसोय होते. त्यामुळे यापुढे प्रत्येक आगारप्रमुखांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शालेय फेरी कोणत्याही परिस्थितीत रद्द होणार नाही, याची दक्षता घ्यावी असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

१६ जूनपासून शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना एसटीचे पास थेट त्यांच्याच शाळेत देण्यात आले आहेत. १६ जून ते ३० जूनपर्यंत तब्बल पाच लाख २१ हजार ३५४ विद्यार्थ्यांनी योजनेतून मोफत पास घेतले आहेत. यापूर्वी विद्यार्थ्यांना एसटीच्या पास केंद्रावरील रांगांमध्ये उभारून किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनाकडून पास घ्यावे लागत होते.

आता विद्यार्थ्यांना पास घेण्यासाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागत नाही. त्यांच्या शाळा- महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्यांकडून त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळांमध्ये जाऊन पास दिले जात आहे.

या संदर्भात १६ जूनपासून एसटी प्रशासनातर्फे 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. तत्पूर्वी, सर्व शाळा- महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक किंवा प्राचार्यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले होते.

## संपादकीय

# संशयाचे वातावरण

बिहारमधील निवडणुकीच्या आधीच तेथील निवडणूक प्रक्रिया सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. निवडणूक आयोगाने घेतलेला एक निर्णय त्यासाठी कारणीभूत ठरला आहे. त्यावर विरोधी पक्षांनी अनेक प्रकारचे आक्षेप नोंदवले आहेत. निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदान प्रक्रियेपूर्वी तेथील मतदार यादीचे इंटेन्सिव्ह रिव्हिजन करण्याचे योजले आहे. गेल्या जून महिन्यातच त्याविषयीचा आदेश त्यांनी काढला आणि एका महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण करण्याचा इरादाही व्यक्त केला आहे. कोट्यवधी मतदारांच्या यादीचे हे पुनरावलोकन केवळ महिनाभरात पूर्ण होणे अशक्य आहे. त्यामुळेच यामागे काहीतरी काळेबेरे आहे, असा विरोधी पक्षांचा आरोप आहे.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल या दोन्ही पक्षांनी पहिल्या दिवसापासून विरोध दर्शवला आहे. या मतदार यादीचे पुनरावलोकन करताना मतदारांकडून त्यांच्या जन्माचे प्रमाणपत्र आणि त्यांच्या आई-वडिलांचे जन्म दाखले मागितले गेले आहेत, त्याला जोरदार आक्षेप घेतला गेल्यानंतर यात काही प्रमाणात शिथिलता दिली गेली असली तरी मूळ संभ्रमाचे वातावरण कायम आहे. बिहारमधील विशिष्ट वर्गाला आणि स्थलांतरित मतदारांना मतदान प्रक्रियेपासूनच दूर ठेवण्याचा सत्ताधारी भाजपचा इरादा असून त्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाची साथ घेतली आहे, असा जाहीर आरोप सुरू आहे.

निवडणूक आयोगाने हे आक्षेप फेटाळून लावले आहेत, त्यांचे म्हणणे असे की दर निवडणुकीतच याद्यांचे असे पुनरावलोकन केले जाते. पण या वेळेला हे पुनरावलोकन केले जाणार आहे त्यासाठी सन 2003 या वर्षाची यादी आधारभूत मानली जाणार आहे. त्यालाही अनेकांचा आक्षेप आहे. मुळात सन 2024 मध्ये ज्या मतदार यादीच्या आधारे लोकसभेची मतदान प्रक्रिया पार पडली त्याच यादीच्या आधारे विधानसभेची निवडणूक घेणे अवघड नसताना हा प्रश्न निवडणूक आयोग का अवघड करून ठेवत आहे असा मुख्य आक्षेपाचा भाग असून त्यावर निवडणूक आयोगाकडून समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेले नाही, असे विरोधी पक्षांचे म्हणणे आहे.

त्यामुळे बिहारची निवडणूक प्रक्रिया आधीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. याआधी महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन राज्यातील निवडणुकांबाबत काँग्रेस पक्षाने अनेक आक्षेप निवडणूक आयोगाकडे नोंदवले आहेत. त्याची उत्तरेही निवडणूक आयोग समाधानकारकपणे देऊ शकलेला नाही. महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणात मतदारांची संख्या कशी वाढली हा काँग्रेसचा मुख्य आक्षेप आहे. यामुळे प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचे सीसीटीव्ही फुटेज आणि मशीन रीडेबल मतदार यादी सादर करावी, अशी मागणी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केल्यानंतर निवडणूक आयोगाने असे पुरावे देण्याचा नियमच बदलला.

त्यातून निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर असलेले आक्षेप अधिकच गंभीर बनले आहेत. निवडणूक झाल्यानंतर निवडणुकीच्या संबंधातील सगळे रेकॉर्ड 45 दिवसांच्या आत डिलीट करण्याचा निवडणूक आयोगाचा आदेशही वादग्रस्त ठरत आहे. त्यामुळे निवडणूक आयोग सध्या चारही बाजूने टीकेच्या भोवऱ्यात सापडला आहे. निवडणूक आयोगाने काँग्रेस नेत्यांना चर्चेला बोलवण्याचे औदार्य दाखवले, पण काँग्रेसने ज्या माहितीची मागणी निवडणूक आयोगाकडे केली ती माहिती न मिळाल्याने, आम्हाला त्यांच्याशी चर्चा करण्यात काहीही स्वारस्य नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे. आम्ही घेतलेल्या आक्षेपाला कोणतेही उत्तर किंवा कोणताही डाटा आम्हाला मिळालेला नसताना आम्ही निवडणूक आयोगाकडे जाऊन नेमकी काय चर्चा करणार, आम्ही काय तेथे केवळ चहा प्यायला किंवा निवडणूक आयुक्तांची शेरोशायरी ऐकायला जाणे अपेक्षित आहे काय, असा काँग्रेसने सवाल आहे.

त्यांचे म्हणणे एका अर्थाने खरे आहे. काँग्रेसने मागवलेली माहिती देण्यास तुम्ही टाळाटाळ करीत असाल तर तुमच्याबरोबर चर्चा करण्यात काय अर्थ आहे किंवा तुमच्याबरोबर नेमक्या कोणत्या मुद्द्यावरोबर चर्चा करणे अपेक्षित आहे हे कळत नसल्याने काँग्रेसने या चर्चेच्या प्रस्तावावर नकारघंटा वाजवली आहे. वरील सगळे संदर्भ लक्षात घेतले तर एकूणच हा सगळा वादाचा आणि संशयाचा मामला आहे. निवडणूक आयोग असा वादाच्या किंवा संशयाच्या भोवऱ्यात सापडणे हे लोकशाहीसाठी चांगले संकेत नाहीत. लोकशाही प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडली गेली असा दावा जर निवडणूक आयोग करू इच्छित असेल तर निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया सुरू होण्याच्या आधी विरोधी पक्षांच्या सर्व आक्षेपांना समाधानकारक उत्तर देणे हे अत्यंत आवश्यक ठरते.

हे पाऊल निवडणूक आयोग उचलणार आहे का, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. निवडणूक आयोग निष्पक्ष असला पाहिजे त्यामुळे आपल्या भोवती निर्माण झालेले संशयाचे ढग दूर करणे ही सर्वस्वी त्यांचीच जबाबदारी आहे. बिहारमधील निवडणुकीच्या आधी काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाच्या सर्व आक्षेपांना उत्तरे दिली गेली पाहिजेत. त्यावर आमचे समाधान झाले अशी प्रतिक्रिया या दोन पक्षांकडून आली पाहिजे, तरच बिहारमधील निवडणूक निष्पक्ष झाली असा अर्थ निघेल. निवडणूक आयोग हा भारतीय जनता पक्षाच्या हातातील बाहुले नाही, तेथे सर्व राजकीय पक्षांना समान न्याय मिळतो हे आपल्या कृतीने दाखवून देण्याचे काम निवडणूक आयोगाने केले पाहिजे.

# ऑर्किडच्या प्रांगणात अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये वारकऱ्यांच्या वेशभुषेतील लहान मुले,पालखी मिरवणूक आणि विठू नामाच्या गजरात नेत्रदीपक असा रिंगण सोहळा अनुभवताना काही क्षण आपण ब्रह्मांडनायक साक्षात विठूरायाच्या पंढरीतच आलो आहोत असे वाटत होते.निमित्त होते आषाढी एकादशी.या पार्श्वभूमिवर नागेश करजगी ऑर्किड स्कुलच्या विद्यार्थ्यांच्या बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्ती पूजनाने करण्यात आली.यावेळी संस्थेच्या सचिवा वर्षाताई विभुते, संस्थेच्या विश्वस्त नंदिनी करजगी, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी,स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे,प्राचार्या रुपाली हजारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी संत गोरा कुंभार यांच्या जीवनावर संगीतमयी नृत्य सादर करीत असताना उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू तरळल्याचे दिसून आले. विठ्ठल रखुमाई,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, संत नामदेव,संत सोपानकाका, संत मुक्ताबाई या संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी,नऊवारी साडी परिधान करून डोक्यावर तुळशी वृंदावन,पांढऱ्याशुभ्र वेषात कपाळाला बुक्का लावून निघालेले छोटे वारकरी त्यांच्या मुखातून निघणारा विठू नामाचा जयघोष करीत शाळेच्या आवारातून निघालेला पालखी सोहळा जुनी मिल परिसर मार्गे वीज वितरण कार्यालयाजवळील महादेव मंदिराला प्रदिक्षणा घालून शाळेच्या आवारात दाखल झाली. यावेळी शालेय परिसरात भक्तिमय वातावरण तयार झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती चाटी यांनी केले.सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आषाढी वारीचे यश हे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेटक्या नियोजनाचे फलित...

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा एक अविभाज्य भाग असून, ती केवळ एक धार्मिक यात्रा नसून सामाजिक सलोखा, शिस्त आणि एकात्मतेचे मूर्त स्वरूप आहे. या महत्त्वपूर्ण वारीचे यशस्वी आयोजन हे केवळ श्रद्धाळूंच्या सहभागावर नाही, तर प्रशासनाच्या सुसूत्र आणि सजग नियोजनावरही अवलंबून असते. दिनांक 6 जुलै 2025 रोजी पार पडलेल्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर, 26 जून ते 10 जुलै 2025 या कालावधीत झालेल्या वारीचे नियोजन हे सोलापूर जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखालील काटेकोर नियोजन व धाडसी निर्णयामुळे ही वारी अधिक सुसंगत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध होऊन यशस्वी झाली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेतृत्वाखाली आषाढी वारी 2024 ही यशस्वी झाली होती. या वारीत स्वच्छतेला अधिक प्राधान्य देऊन त्याचे काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्याने वारकरी, भाविक यांना चांगल्या सुविधा मिळाल्या होत्या. परंतु मागील वर्षीच्या वारीच्या अनुभवावर पालखी, दिंडया, पालखी महामार्ग, वाखरी पालखी तळ, 65 एकर व पंढरपूर शहर या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटल्याने जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आषाढी वारी 2025 मध्ये त्या अनुषंगाने नियोजनबद्ध निर्णय घेऊन त्या निर्णयाची प्रत्यक्ष अमलबजावणी केली व ती अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे की नाही याची खात्रीही स्वतः फिल्डवर जाऊन केली. यावेळी गर्दीच्या ठिकाणी जाताना भाविकांना त्रास होऊ नये यासाठी त्यांनी पायी जाणे, बाईकवर जाऊन देखरेख व नियंत्रण ठेवले. त्यामुळे वारकरी, भाविक यांना अधिक चांगल्या व वेळेत सुविधा देण्याची व्यवस्था अधिक तत्परतेने झाली.

### उजनी धरणातील पाण्याचे नियोजन –

यावर्षी पावसाचे प्रमाण खूप अधिक असल्याने तसेच उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने उजनी धरणात उपयुक्त पानासाठी जवळपास 73% झाला होता व भीमा नदीत पाणी सोडले जात होते. त्यामुळे पंढरपूर येथे चंद्रभागा नदीला पूर परिस्थिती निर्माण होऊन संपूर्ण वाळवंट पाण्याखाली गेलेले होते. तसेच नीरा नदीचे पाणी व उजनी धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करून चंद्रभागा नदी पात्रात पाणी आवश्यक त्या प्रमाणातच राहील यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद स्वतः लक्ष घालून या पाण्याचे नियंत्रण व नियोजन करत होते. त्यासाठी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्कात राहून उजनी धरणातील सोडण्यात येणारे पाणी कमी करून यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीचे वाळवंट भाविकांसाठी रिकामे राहील याची दक्षता त्यांनी घेतली.

### व्हीआयपी दर्शन बंद

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पद दर्शनासाठी वारकरी सर्वसामान्य भाविक मोठ्या प्रमाणावर दर्शन रांगेत किमान 15- 16 तास उभे राहतात. तसेच व्हीआयपी दर्शनामुळे हा कालावधी अधिक वाढू शकतो याचा अनुभव मागील वारी कालावधीत आलेला होता. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा खूप मोठा व धाडसी निर्णय सर्वसामान्य भाविकांसाठी घेतला. व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेणारे ते पहिलेच जिल्हाधिकारी ठरले. या निर्णयामुळे भाविकांमध्ये आनंदी वातावरण झाले तसेच पदस्पर्श दर्शनाचा कालावधी किमान पाच ते सहा तासांनी कमीही झाला. त्यामुळे दर्शन रांगेत उभा राहणाऱ्या लाखो भाविकांना याचा फायदा झाला. या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी हा निर्णय सर्वसामान्य वारकरी भाविक यांचे दर्शन लवकर व्हावे व त्यांना दर्शन रांगेत जास्त वेळ उभा राहावे लागू नये यासाठी कोणालाही न विचारता स्वतःच्या अधिकारात घेतला. मागील पन्नास वर्षापासून व्हीआयपी दर्शन बंद करण्याबाबतची फक्त चर्चा होत राहिली, परंतु जिल्हाधिकारी यांनी हा निर्णय घेऊन वारकऱ्यांचे व सर्वसामान्य भाविकांचे दर्शनाची वेळ खूप कमी केली, त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत असले तरी त्यांना या निर्णयाचा अप्रत्यक्षपणे त्रास ही झाला.

### नो व्हेईकल झोन

अति महत्त्वाच्या व्यक्तींची वाहने थेट मंदिरापर्यंत येत होती. त्यामुळे सर्वसामान्य भाविक वारकऱ्यांना खूप त्रास होत होता. तसेच चौपाळ ते मंदिर या रस्त्यावर खूप मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने अनुचित घटना घड नेची शक्यताही नाकारता येत नव्हती. त्यामुळे चौपाळ ते मंदिर हा रस्ता नो व्हेइकल झोन करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढले. त्यामुळे मंदिर प्रदक्षिणा तसेच दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भाविकांना याचा फायदा झाला तसेच पोलीस प्रशासनावरील ताण ही कमी झाला. या निर्णयाचे वारकरी संप्रदाय व सर्व सामान्य नागरिकांनी कौतुक केले. परंतु याही धाडसी निर्णया बाबत त्यांना त्रास झाला.

### नामदेव पायरी ते चौपाळ रस्ता भाविकांसाठी वन वे

आषाढी वारीत नामदेव पायरी तसेच श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी मंदिर परिसरात खूप मोठी गर्दी भाविक करतात. चौपाळ ते मंदिर पर्यंत नवे कल झोन केले तरी मंदिर प्रदक्षिणा करणाऱ्या भाविकांची संख्या खूप मोठी असते. मंदिरातून दर्शन घेऊन जाणारे भाविक ही बाहेर पडतात. त्यामुळे येथे वारकऱ्यांची भाविकांची लाखोंची संख्या असते. त्यामुळे या ठिकाणी चेंगरा चेंगरी होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे नामदेव पायरी ते चौपाळ हा रस्ता पायी चालत जाणाऱ्या भाविकांसाठीही वनवे करण्यात आला. त्यामुळे पोलीस विभागाला गर्दीवर योग्य नियंत्रण ठेवणे शक्य झाले व यातून कोणत्याही प्रकारची अनुचित घटना होण्यापासून प्रशासनाला यश मिळाले.

### आषाढी साठी भाविकांचे गदीर्चे रेकॉर्ड

आषाढी वारी 2025 मध्ये प्रशासनाने अनुमान लावल्याप्रमाणे 20 ते 22 लाख पंढरपूर मध्ये दाखल झालेले होते. कारण यावर्षी पाऊस वेळेपूर्वी झालेला होता व शेतकरी वर्गाच्या बहुतांश पेरण्या ही पूर्ण झालेल्या होत्या त्यामुळे वारीला मोठी गर्दी होईल याची अपेक्षा प्रशासनाने केलेली होती व त्यानुसारच नियोजन ही केलेले होते. विठ्ठल रुक्मिणीच्या पददर्शनाची रांग गोपाळपुराच्या पुढे गेलेली होती. ही रांग आणखी खूप पुढे जाण्याची शक्यता होती. एक तर पंढरपूर मध्ये आलेल्या भाविकांना दर्शन रांगेत पोहोचण्यासाठी सात आठ किलोमीटर प्रवास करावा लागत होता. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पुढाकार घेऊन गोपाळपूरच्या जवळ हॉटेल आसरा समोर एक जर्मन हंगर टेन्ट व तिथून सातशे मीटर अंतरावर एका शेतकऱ्याच्या शेतात दुसरा जर्मन हंगर टेन्ट रातोरात उभा करून घेतला. पहिल्या टेन्ट मध्ये दीड किलोमीटरची रांग तर दुसऱ्या टेन्ट मध्ये अडीच किलोमीटरची दर्शन रांग अड्जस्ट करण्यात आली. तसेच दर्शन रांगेत देण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधा त्यांच्या बाहेर एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या तसेच पोलिसांनाही या ठिकाणी नियंत्रण ठेवणे शक्य झाले. व भाविकांनाही याचा खूप मोठा लाभ झाला. जवळपास चार किलोमीटरच्या दर्शन रांगेचे टेंटच्या माध्यमातून व्यवस्थापन करण्यात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

### पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढली

आषाढी वारी 2025 च्या अनुषंगाने पंढरपूर शहरात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी वीस लाखापेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता प्रशासनाने गृहीत धरली होती त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर शहरातील सर्व रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याबाबत उपविभागीय अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी व पंढरपूर नगरपरिषद यांना निर्देश देणे दिले होते त्या अनुषंगाने शहरातील सर्व अतिक्रमणे काढून रस्ते मोकळे व प्रशस्त करण्यात आले होते त्यामुळे भाविकांना अतिक्रमणाचा कोणताही त्रास होणार नाही व गर्दीवर नियंत्रणासाठी ही हा निर्णय महत्वपूर्ण ठरला. तसेच पालखी मार्ग पालखीतळ या ठिकाणी झालेली ही अतिक्रमणे काढून टाकण्यात आली तसेच पंढरपूर शहर व पालखी मार्गावर अवैध होर्डिंग काढून घेण्यात आले. तसेच असे होर्डिंग्स पुन्हा कोणी उभे केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

### पालखी तळ सुविधा

श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या मार्गावरील पालखी तळ तसेच विसावा ठिकाणी पावसामुळे चिखल होऊ नये यासाठी मागील वर्षीच्या अडीच पट मुरमीकरण करण्यात आले. तसेच तळा वरून शौचालयास जाण्यासाठी ही रस्त्यावर मुरमीकरण करण्यात आले. तसेच पालखीतळावर 94 वॉटरप्रूफ तर 11 जर्मन हँगर मंडप उभारण्यात आले. यातून 7 लाख 85 हजार चौरस फूट जागा उपलब्ध झाली जी मागील वर्षी तीन लाख 12 हजार चौरस फुटाचे वॉटरप्रूफ मंडप टाकण्यात आलेले होते, मागील वर्षीच्या अडीच पट जास्त वॉटरप्रूफ मंडप टाकण्यात आलेले होते. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोबत पाच मोबाईल चार्जिंग व्हॅन देण्यात आलेल्या होत्या. तसेच पालखी मार्गावर विष ठिकाणी बीएसएनएलच्या मदतीने टेलिफोन स्टॅन्ड उभारण्यात आले होते याद्वारे वारकरी आपल्या नातेवाईकाच्या संपर्कात राहू शकत होते.

### स्वच्छता

मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी आषाढी वारीत स्वच्छतेला खूप मोठे प्राधान्य देण्यात आलेले होते. मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन यावर्षी ॲडव्हान्स मोबाईल टॉयलेट सिस्टीम उभी केलेली होती. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी साठी 3600 मोबाईल टॉयलेट तर जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसाठी 2400 मोबाईल टॉयलेट पुरवठा करण्यात आला होता. हे सर्व टॉयलेट सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत व सर्व पालखीतळावर पोहोचवण्यासाठी मोबाईल टॉयलेट सिस्टीम चा वापर करण्यात आला. यासाठी एका उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून त्याच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात आला होता. पालखी तळावर मुक्कामाला येण्यापूर्वीच मोबाईल टॉयलेटची व्यवस्था तसेच त्यासाठी आवश्यक असलेला पाणीपुरवठा व सफाई कर्मचारी यांची उपलब्धता केली जात होती, त्यामुळे कोठेही अस्वच्छता निर्माण झालेली नाही.

पालखी मार्ग, पंढरपूर शहर, वाखरी तळ तसेच 65 एकर या भागात मोबाईल टॉयलेट वारकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आलेले होते. या टॉयलेटची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी सफाई कर्मचारी, पाण्याची व्यवस्था उपलब्ध केलेली होती. तसेच वारी कालावधीत पालखी मार्ग पंढरपूर शहरात कोणत्याही प्रकारची अस्वच्छता निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः पुढाकार घेऊन सफाई कर्मचाऱ्यांचे सुपरवायझर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी व पंचायत समितीचे बिडीओ त्यांच्या तीन ते चार बैठका घेतल्या. यात त्यांना त्या त्या भागातील शौचालयाचे नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. या माध्यमातून सुपरवायझर वर खूप मोठे नियंत्रण निर्माण करून त्याच्या मार्फत सफाई कर्मचाऱ्याकडून टॉयलेटची स्वच्छता राबवली गेली. जर कोठेही अस्वच्छता राहिली तर संबंधित भागाचे सुपरवायझरवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आलेले होते. त्यामुळे सुपरवायझर यांनी संबंधित सफाई कर्मचारी यांच्याकडून टॉयलेटची स्वच्छता उत्तम प्रकारे करून घेतली. व संपूर्ण पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावर खूप चांगली स्वच्छता राहिली, यात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केलेले सूक्ष्म नियोजन खूप महत्वपूर्ण ठरले.

### सक्शन व जेटिंग मशीन साठी कॉरिडॉर

पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावर मोबाईल टॉयलेट मधील मैला काढून घेऊन दुसरीकडे डम्प करण्यासाठी सक्शन व जेटिंग मशीन वारकऱ्यांच्या गदीर्तून बाहेर काढण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी तसेच पंढरपूर नगरपरिषद त्यांच्याशी समन्वय ठेवून कॉरिडॉर तयार करण्यात आला. त्यामुळे ही वाहने गदीर्तून बाहेर काढणे व त्याभागाची स्वच्छता राखणे प्रशासनाला शक्य झाले. तसेच जिल्हाधिकारी आशीर्वाद त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन शौचालयाची व्यवस्था केलेल्या प्रत्येक ठिकाणी दिनांक 3, 4, 5 व 6 जुलै रोजी स्वच्छतेची पाहणी केली. तसेच ज्या ठिकाणी अस्वच्छता राहिली आहे त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना त्याबाबतचे निर्देश दिले त्यातून स्वच्छतेच्या अनुषंगाने खूप मोठा संदेश सर्व ठिकाणच्या सफाई कर्मचाऱ्यांमध्ये गेला. जिल्हाधिकारी महोदयांनी गदीर्ची परिस्थिती पाहता काही ठिकाणी पायी जाऊन तर काही ठिकाणी बाईकवर जाऊन पाहणी केली.

### आरोग्य सुविधा

वारकऱ्यांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी पालखी मार्ग पालखी स्थळ असे फिल्डवर 25 ICU कक्ष स्थापन करण्यात आले. सोलापूर जिल्ह्याच्या बाहेरून 100 स्पेशालिस्ट डॉक्टरची सेवा वारीसाठी घेण्यात आली. यामध्ये बालरोग, स्त्रीरोग व अस्थिरोग तज्ञ विविध आजारावरील तज्ञांचा समावेश होता. आरोग्याच्या सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये 3 कोटी 50 लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी 121 ॲम्बुलन्स बाईक तसेच पालखी मार्ग पालखीत या ठिकाणी 143 किरकोळ आजारावर उपचारासाठी आरोग्य सेवा कक्ष निर्माण केलेले होते. तसेच पालख्यांसाठी 4500 मेडीकल किट वाटप करण्यात आलेले होते.

### आपत्ती व्यवस्थापन

वारी कालावधी गर्दीचे योग्य नियंत्रण होणे आवश्यक होते त्या अनुषंगाने 13 हॉटस्पॉट शोधण्यात आले व प्रत्येक हॉटस्पॉट वर पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले तसेच पोलीस टीम सोबत या ठिकाणी एक कऊव पक्ष निर्माण करण्यात आला. या स्पॉटवर कोणतीही अनुचित घटना होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही केली जात होती.

### एकात्मिक नियंत्रण कक्ष –

पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या जवळ वारी कालावधीत सर्व शासकीय विभाग प्रमुखांसाठी इंटिग्रेटेड कंट्रोल रूम निर्माण केलेली होती. या अंतर्गत तुझी सेवा असलेले 100 नोकिया फोन संबंधित कार्यालय प्रमुखांना देऊन वारी कालावधी परस्पर संवाद व समन्वय यासाठी याचा वापर करण्यात आला, त्यातून सर्व संबंधित विभागात समन्वय चांगला होऊन वारकऱ्यांना अधिक तत्परतेने सेवा देणे सुलभ झाले. या ठिकाणी 280 सीसीटीव्ही च्या माध्यमातून संपूर्ण पंढरपूर शहरातील फीड मिळत होते. त्यामुळे अत्यंत गतीने निर्णय घेणे शक्य झाले व यातून कोणताही अनुचित प्रकार घडून येण्यासाठी करडी नजर ठेवली जात होती. प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी 50 ठिकाणी मोफत वायफाय ची सुविधा उपलब्ध केली होती.

### होडी चालक नोंदणी अनिवार्य

चंद्रभागा नदी जल प्रवासी वाहतूक करणाऱ्या प्रत्येक होळीचालकाची नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले होते. यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संबंधित होडी चालक यांच्या समवेत किमान तीन ते चार बैठका घेऊन त्यांना विविध मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. 190 होडीची नोंद प्रशासनाकडे झाली, त्या सर्व होडी चालकांनी सर्व होडी व्यवस्थित असल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक होते. प्रत्येक होडी मध्ये वीस पॅसेंजर प्लस दोन होडी चलक असे 22 व्यक्तींनाच जलप्रवास करणे अनिवार्य करण्यात आलेले होते. जलप्रवास करताना प्रत्येक होडीवर लाईफ जॅकेट आणि वारे होते जिल्हा प्रशासनाच्या वतीने 1000 लाईफ जॅकेट होडीच्या लोकांना पुरवण्यात आलेले होते. तसेच चंद्रभागा नदीपात्रात सहा ठिकाणी जेटी पॉइंट तयार केले होते या प्रत्येक पॉईंट मधूनच जल वाहतूक करण्याचे बंधन होडीच्या लोकांना घालण्यात आलेले होते. त्यामुळे पोलीस विभागामार्फत जल प्रवासी वाहतूक व होडी चालक यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवणे खूप सुलभ झाले. यासाठी 16 पोलीस कर्मचारी नियुक्त केलेले होते. तसेच प्रशासनाच्या वतीने मागील वर्षीच्या नऊ लाईफ बोटी मध्ये वाढ करून एकूण 22 लाईट होती चंद्रभागा नदीपात्रात ठेवण्यात आलेल्या होत्या यावर २६४ पट्टीचे पोहणारे व प्रशिक्षित व्यक्तींची नोंदणी नियुक्ती करण्यात आलेली होती यामध्ये एनडीआरएफचे जवान तसेच कोल्हापुर येथील 75 पोहणारे युवक तर पंढरपूर शहरातील कोळी समाजाचे पट्टीचे पाहणारे 50 युवक मानधनावर कार्यरत होते. मागील एका आठवड्यात नदीच्या पाण्यात बुडणाऱ्या 23 व्यक्तींचा बचाव या पथकाकडून करण्यात आलेला होता. या 23 व्यक्तींना मिळालेले जीवनदान हे जिल्हा प्रशासनाने केलेल्या काटेकोर नियोजनाचे फलित होते.

**– सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

## प्रबोधन

# अज्ञानाने झाले ।अर्धमेले जन

एकविसाव्या शतकातील दुसरं दशक भ्रष्टाचारस्फोटक दशक म्हणून काळ्या अक्षरांत नोंदवायला हवं. आता भविष्यकाळी भ्रष्टाचारस्फोटक वर्ष, मास, दिनही नोंदण्याची वेळ यायला प्रारंभ होईल. भ्रष्टाचार हा दुष्टाचार, दुराचार, अत्याचार, बलात्कार, दुर्बलाचार, लाचाराचार असतो. म्हणूनच तो त्यात गुंतलेल्यांनी केलेला राष्ट्रघात असतो. स्वातंत्र्योत्तर काळाची प्रारंभीची दहा-वीस वर्षे सोडली, तर गेल्या तीस-चाळीस वर्षांत भ्रष्टाचाराचं यंत्र दिवसेंदिवस अधिक गतिमान कसं होत चाललं आहे आणि त्याच्यावरील सर्वांचंच नियंत्रण पूर्णपणे कसं सुटलंय, हे सवयीने लक्षातच येईनासं झालंय. भारत हा या दृष्टीने जगातील एक सर्वात जास्त दुर्दैवी देश आहे, असं कुणी म्हटलं तर ते खोटं ठरणार नाही.

भ्रष्टाचार शोधण्याचा प्रारंभ पूर्वी नोकरशहांपासून केला जात असे. पण आता भ्रष्टाचाराचा दिल्लीपासून गल्लीपर्यंत पाझर सिद्धान्ताधारे (downword filteration theory) शोध घेणं आवश्यक आहे. लाच घेण्याचं प्रशिक्षण नोकरशहांपासून राजकारण्यांनी घेतलं असेल. पण आज राजकारण्यांकडून लाचशास्त्र नोकरशहांनी शिकावं इतके राजकारणी या शास्त्रात पारंगत झाले आहेत. निवडणुकीचा फंड आधी गुंडपुंडांकडून जमवला जातो, मगच प्रचाराचा नारळ फोडला जातो. उदासबोधकर्ते कवी मंगेश पाडगावकर म्हणतात, हातभट्टीवाले गुंड। बिल्डर, स्मगलर आदिक पुंड। यांचे कृपेने जमवी फंड। धन्य तोचि ॥ इंग्रजीत ही॥ begin is half done ही म्हण येथे वेगळ्या अर्थी वापरून हा भ्रष्टाचाराचा निम्मा अवतार आहे, असं म्हटलं पाहिजे. कुणी आणखी वेगळा मार्ग धरतो. संस्था स्थापोन अध्यक्ष व्हावे। दमदाटी करोन पैसे जमवावे। संस्थांसि बाले किल्ले समजावे। निवडणुकीचे ॥ राजकारण्याची नजर नंतर जनतेकडे न वळेल तरच नवल! बिचाऱ्या दुबळ्या जनतेला प्रत्येक समथार्पुढे बळी जाण्याशिवाय पर्याय नसतो. कवी म्हणतात, कंडम बरगड्यांच्या जनतेवरी। बिल्डर, स्मगलर, गुंड राज्य करी। प्रत्येक नेता खिसा भरी। हाती धरोनी तयासी॥ भ्रष्टाचाराच्या मागार्चा शेवटचा टप्पा असतो खुर्ची! नेत्याला खुर्ची मिळाली की, तीच नेत्याच्या सर्व सुख-समृद्धीला जन्म देऊ लागते. खुर्चीचं महिमान अवर्णनीय असतं, खुर्ची म्हणजेच सत्ता। खुर्ची म्हणजेच भत्ता। खुर्ची म्हणजे सुबत्ता। पाच पिढ्यांची ॥

भारतीय राज्यसत्तेच्या जवळजवळ सर्वच खुर्थ्यांना भ्रष्टाचाराने इतकं करकचून आवळलं आहे की, त्यातून त्यांचं पावित्र्य, कर्तव्यनिष्ठा, सेवावृत्ती, साधेपणा यांचा चुराडा झाल्याशिवाय राहाणं शक्यच नाही. याचा गैरफायदा घेऊन दलाल, उद्योगपती, व्यापारी हे सारेच माजतात. संधिसाधू, नफेखोर व्यापाऱ्यांचं वर्णन करताना कवी म्हणतात, सत्तेस वळखले आतून ।हप्ते सर्व ठेवले बांधून । पैशाशी पैसा ऐसा सांधून । रास करी गुप्त जागी लांडग्या- सारख्या बुभूक्षित व्यापाऱ्यांच्या तावडीत सापडतो दुबळा, हतबल, अज्ञानी, कर्जबाजारी शेतकरी स्वतः पिकवलेल्या धान्याला पारखा होऊन उपाशीपोटी मरमर मरून शेतीची कामं करणारा बिचारा किसान. जय जवान, जय किसान हा नारा माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्रींनी दिला. तोही आता कोणाला आठवू नये, ही देशाची दुरावस्था दुरुस्तीच्या पलीकडे कधी गेली, तेही कोणाला कळेनाशी झाल्याने कवी दुःखाने म्हणतात, पिकवणारा मरोन जावो। विकणारा त्यास विकोन खावो । युक्तीने भडकवून भावो। गब्बर होवो ये लोकी ॥

आपल्या दुरावस्थेतून शेतकऱ्याने बाहेर पडावं, त्याला परवडणाऱ्या व्याजाने पतपुरवठा केला जावा म्हणून दूरदृष्टीच्या छत्रपती शाहू महाराजांनी सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या बँकेची स्थापना केली. सहकारी चळवळीला चालना दिली. पण स्वतंत्र भारतात विना सहकार नही उद्धार । या ध्येयदर्शक तत्त्वात विना स्वाहाकार नहीं उद्धार-असा नवा मंत्र रूढ झाला आणि दीनोद्धारक सहकारातत्त्व अडगळीत पडलं. सहकारमहर्षी स्वाहाकारमहर्षी झाले. कवी म्हणतात, सहकाराची घालोनी झडप। कोणी तिजोरीच केली गडप ।जाणोनी त्याची तडफ । मंत्री केले तयासि ।

महात्मा फुले हे शिक्षणप्रसाराचे थोर पुरस्कर्ते, छत्रपती शाहू यांचे थोर अनुयायी. तर डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षण खेडोपाडी नेणारे भगीरथ ! पण विनाअनुदान शिक्षण संस्थांचं धोरण चांगल्या हेतूने शासनाने जाहीर केलं, पण त्याचा गैरफायदा घेतला टग्यांनी! शिक्षणमहर्षी काळाच्या पडद्याआड गेले आणि शिक्षणसम्राट भ्रष्टाचाराच्या आकाशात तळपून समाजाचे डोळे दिपवू लागले. राष्ट्रीय भ्रष्टाचाराच्या गंगेला शैक्षणिक भ्रष्टाचाराची यमुना मिळाली. शिक्षणसम्राटांचे घोडे या महान संगमात डोक्यापासून शेपटीपर्यंत न्हाऊन धन्य धन्य झाले. कवी वर्णन करतात, शिक्षणासारखा बेत नाही । शिक्षणासारखा होत नाही । शिक्षणासारखे शेत नाही। जाणती थोडे भ्रष्टाचार ही दुर्धर व्याधी लोकपाल विधेयकाने तरी दूर होईल की, भ्रष्टाचाऱ्यांना त्यामुळे एक नवं क्षेत्र उपलब्ध होईल? मात्र लाचविज्ञान ही आता राष्ट्रीय महत्त्वाची ज्ञानशाखा होऊ पाहात आहे. कवी म्हणतात, लाच खाणं हे नवविज्ञान। त्याचे शिकावे तंत्रज्ञान। ज्यास कळे तो सज्ञान । भारतदेशी ।। या साऱ्या अनर्थ परंपरा भारताच्या सुपुत्रांनी आकाशपाताळ एक केल्याशिवाय संपणार नाहीत. कारण –

भारताला गिळू । पाहे अजगर
नाव भ्रष्टाचार असे त्याचे ॥१
त्याच्या विळख्यात । देश अडकला
नाही मदतीला येत कोणी ॥२
पळाले त्यातून । सुटून लबाड
घेऊन घबाड । विना कष्ट ॥३
दुबळ्यांचा जीव । वाचणार कसा
गुदमरे असा । भ्रष्टाचारे ॥४
जागोजाग याची। पिलावळ दिसे
वेढा घालीतसे। गरिबाला ॥५
अज्ञानाने झाले । अर्धमेले जन
टाकतो गिळून। सहजचि ॥६
भारतपुत्रांनो। उठा त्वरा करा
आळस न बरा। आत्मघाती ॥७
करा शतखंड। दुष्ट या सर्पाचे
कार्य देशोध्दाराचे । हेच थोर ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## वात्रटिका

### दुब्याची खुबी

खुबे उडवून बोलले दुबे
पोषण करतो महाराष्ट्राचे...
खायला येणारेच म्हणतात
तुम्हीच खातय आमचे...
आपटून आपटून मारणारे
तोंडावर आपटले...
तुटून पडले त्याच्यावर आणि
सगळ्यांनी कान उपटले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी मार्गदर्शनपर व्याख्यान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्या युनियन बँक ऑफ इंडिया मध्ये कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विनायक बाबर हे लाभले होते. प्रारंभी मा.




विनायक बाबर यांचा सत्कार प्राचार्य सागर महाजन यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला. त्यानंतर विनायक बाबर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पदवीनंतर बँकिंग क्षेत्रातील विविध करिअर संधी या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील विविध स्पर्धा परीक्षा, त्यासाठी तयारी कशी करावी, करिअर म्हणून बँकिंग क्षेत्रातील विविध आव्हाने यासोबतच त्यासाठी लागणारी संवाद कौशल्य, लेखन, टायपिंग, अद्यावत तंत्रज्ञान, भाषा प्रभुत्व आदिंविषयी माहिती दिली. यासोबतच त्यांनी कृषि जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील बियाणे व खते कंपन्या, संशोधन क्षेत्र, कृषी विभागातील विविध करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नक्षत्रा कांबळे यांनी व आभार प्रियंका वळसे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रा आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अंकिता पवार, प्रा. निशा काटे तसेच लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे सर्व विदयार्थी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये गुरुपौर्णिमेची व्यापक तयारी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** गुरुपौर्णिमेनिमित्त अक्कलकोट नगरीत येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता यंदा प्रशासनाने नियोजनबध्द आणि तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज अशी तयारी सुरू केली आहे. भाविकांची अचूक गणना करण्यासाठी मंदिराच्या प्रवेशद्वारात चार ठिकाणी डिजिटल कॅमेरे बसविण्यात येणार असून, नऊ ठिकाणी पार्किंग आणि तीन ठिकाणी मदत केंद्रांचीही स्थापना होणार असल्याची माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने भाविक येणार असल्याचे गृहीत धरून प्रशासनाने डिजिटल यंत्राद्वारे गणना करण्याचा निर्णय घेतला आहे. मागच्या प्रगटदिनी



फक्त एका कॅमेऱ्याच्या साहाय्याने ७२ तासांत अडीच लाख भाविकांची नोंद झाली होती. यावेळी चारही मुख्य प्रवेशद्वारांवर कॅमेरे लावण्यात येणार आहेत, ज्यामुळे गर्दीच्या व्यवस्थापनात अधिक अचूकता येणार आहे. याची माहिती वरिष्ठ स्तरावरील शासकीय यंत्रणांनाही देण्यात येणार आहे, ज्यामुळे आवश्यक त्या उपाययोजना लवकर करता येतील.

वाहतुकीस अडथळा न होता भाविकांना सोयीस्करपणे दर्शन घेता यावे, यासाठी नऊ ठिकाणी पार्किंगची सुविधा करण्यात आली आहे. या ठिकाणी मंगरूळ हायस्कूलसमोरील मैदान, हत्ती तलाव परिसर, शेख नुरुद्दीन बाबा दर्गा पटांगण, मैंदर्गी रोडवरील स्मशानभूमी शेजारील जागा, स्वामी समर्थ हॉस्पिटल परिसर, कांदा बाजार, बसस्थानकाजवळील मल्लिकार्जुन मंदिर प्रांगण, हन्नूर रोडवरील त्रिकोणी जागा इत्यादींचा समावेश आहे.

उत्सव काळात भाविकांना कोणतीही अडचण भासू नये म्हणून समाधी मठ, वटवृक्ष मंदिर परिसर आणि मंगरूळ हायस्कूल भागात पोलीस मदत केंद्र कार्यरत राहणार आहेत. गर्दीच्या वेळापत्रकात मार्गदर्शन, सुरक्षा व आरोग्यसेवा यासारख्या बाबतीत ही केंद्रे उपयोगी ठरणार आहेत. तांत्रिक सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि मदत केंद्रांच्या माध्यमातून भाविकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची पूर्ण खबरदारी घेण्यात येत आहे. गुरुपौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, श्रध्दा आणि भक्तीचा महामेळा आहे. त्यामुळे अक्कलकोट नगरीतील प्रशासनाने यंदाच्या उत्सवासाठी केलेल्या तयारीमुळे हा सोहळा अधिक सुरक्षित आणि भाविकांसाठी अविस्मरणीय ठरणार आहे.

### एकत्रित पाहणी अन अंमलबजावणीला सुरुवात

मागील आठवड्यात तहसीलदार विनायक मगर, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, नगरपरिषदेचे अधिकारी व संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे शहरातील विविध ठिकाणांची पाहणी केली होती. त्यानंतर अंतिम आराखडा निश्चित करण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरू झाली आहे. त्यामुळे यंदाचा गुरुपौर्णिमा उत्सव अधिक शिस्तबध्द आणि भाविकांसाठी सुलभ होणार आहे.

# छत्रपती शिवरायांचे विचार अंगीकारा

**अक्कलकोट(कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या मातीतून उभे राहिलेले स्वराज्याचे स्वप्न पाहणारे आणि ते साकार करणारे एक महान व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांच्या कार्याचा, त्यांच्या विचाराचा आणि शौर्याचा गौरव आजही होतोय, पुढे ही होत राहणार. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक राजा नव्हते, तर ते एक महान व्यक्तिमत्त्व होते, त्यांचे विचार आणि कार्य आपल्याला कायमच प्रेरणा देत राहील, छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे संकल्पित कार्य स्वराज्याच्या हितार्थ केले, आजच्या पिढीने शिवरायांचे विचार अंगीकारणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले.



> अन्नदान हे श्रेष्ठ दान असून, तीर्थक्षेत्र अक्कलकोटात स्वामी भक्तांसाठी जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ स्थापन करून एक मातृत्व संस्था म्हणून त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून धार्मिक कार्याबरोबरच समाज उपयोगी कार्य त्यांच्या हातून घडत आहे. अन्नछत्र हे संवेदनशीलतेचे प्रतिबिंब आहे.
>
> **- दीपक केसरकर,** आमदार, माजी मंत्री
>
> श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३८ वा वर्धापन दिन व गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. माझ्यासारख्या वक्त्याला वेळोवेळी संधी देऊन ते समाज प्रबोधन करीत आहे, याचा सार्थ अभिमान आहे.
>
> **- प्रा. नितीन बानुगडे-**पाटील, व्याख्या

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३८ वा वर्धापन दिन व गुरूपौर्णिमा महोत्सवानिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शुक्रवारी ख्यातनाम व्याख्याते प्रा. नितीन बानुगडे-पाटील यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यानाने ५ वे पुष्प झाले.

दरम्यान कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन राज्याचे माजी शिक्षण मंत्री आमदार दीपक केसरकर, राज्य आर.पी.आय. (आठवले गट) सचिव- राजाभाऊ सरवदे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष- महेश इंगळे, श्री व सौ. चंद्रशेखर विनायक मंत्री, झोनल मॅनेजर, बँक ऑफ इंडिया सोलापूर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अक्कलकोट तालुका अध्यक्ष- दिलीपभाऊ सिद्धे, श्री. व सौ. संजय कुलकर्णी (जीएसटी विभाग), सुरेश सूर्यवंशी, बाबासाहेब निंबाळकर, बाळासाहेब मोरे, गोव्याचे पोलीस निरीक्षक लक्सी अमोणकर, झिला पेडणेकर, अनंत मालवणकर, गुरुराज नाडगोडा, आर.पी. आय. (आठवले गट) तालुका अध्यक्ष- अविनाश मडीखांबे, सन्नी ठेंगील, गोगावचे सरपंच वनिता सुरवसे, समीर लोंढे, नागेश भिसे, नवाज भाई, नागेश बिद्री यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिलेले राज्याचे माजी शिक्षण मंत्री आमदार दीपक केसरकर यांचा सत्कार न्यासाच्या वतीने करण्यात आला.

प्रा. बानुगडे-पाटील पुढे म्हणाले की, जगभरात शिवरायांचा आदर्श घेतला जातो. नेताजी सुभाषचंद्र बोस हे तुरुंगात असताना शिवचरित्राचे वाचनाच्या प्रभावाने त्यांनी वेषांतर करून तुरुंगातून बाहेर येऊन आझाद हिंद सेनेची स्थापना केली, छत्रपती शिवरायांचा महामंत्र घेऊन त्यांनी देशासाठी लढले असे सांगून, प्रा. बानुगडे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, शिक्षण स्वराज्याची स्थापना, प्रेरणा देणारे कार्य, एक महान देशभक्त, कुशल प्रशासक, आंतरराष्ट्रीय कीतीर्चे सरसेनापती, याबाबत अंगावर शहारे उभे करणारे शिवरायांचा इतिहास सांगून उपस्थित श्रोते गणांना मंत्रमुग्ध केले. शिवचरित्र अत्यंत सुंदर शब्दात मांडले. युवकांनी प्रचंड गर्दी केली होती. याप्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. न्यासाचे पुरोहित सोमकांत व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन झाले. न्यासाचे विश्वस्त अलकाताई जन्मेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.

### गुणीजन गौरव

विश्वनाथ गुरप्पा देवरमनी जि.प. प्राथमि शाळा, नागणसूर (कृषी), महेश रामराव घुटे, वरिष्ठ शाखा प्रबंधक, बँक ऑफ इंडिया, शाखा- अक्कलकोट (बँकिंग), रमेश शिवराया पुजारी, प्रयोगशाळा परिचर सी. बी. खेडगी महाविद्यालय, अक्कलकोट, सवाई शिवाजी चुंगीकर, सेवेकरी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# देशात सुमारे २.६ कोटी लोकांना रोजगार निर्मितीचा लाभ मिळणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रोजगार, कौशल्य आणि इतर संधी सुलभ करण्यासाठी पंतप्रधानांच्या ५ योजनांच्या पॅकेजचा भाग म्हणून २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात रोजगाराशी संबंधित प्रोत्साहन योजना (एम्प्लॉयमेंट लिंक इंटेन्सिव्ह स्कीम एछक) जाहीर करण्यात आली. देशात सुमारे २.६ कोटी लोकांना रोजगार निर्मितीचा लाभ मिळणार आहे. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्षेत्रीय भविष्य निधी सोलापूर विभागाचे आयुक्त पुरुषोत्तम मीना यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने १ जुलै २०२५ रोजी याला मंजुरी दिली. रोजगार निर्मिती, रोजगार करण्याची क्षमता, सामाजिक सुरक्षा हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेच्या पहिल्या भागात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय (पीएफ) मध्ये नोंदणीकृत पहिल्यांदाच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लक्षात घेऊन या भागात १५ हजार रुपयांपर्यंतचा एक महिन्याचा ईपीएफ पगार दोन हप्त्यांमध्ये दिला जाईल. याचा फायदा सुमारे १.९२ कोटी पहिल्यांदाच नोकरी शोधणाऱ्यांना होईल. तसेच या योजनेच्या दुसऱ्या भागात किमान ६ महिने सतत नोकरी करणाऱ्या प्रत्येक अतिरिक्त (नव्या) कर्मचाऱ्यांसाठी नियोक्त्याला २ वर्षांसाठी दरमहा ३ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे. देशात सुमारे २.६ कोटी लोकांना रोजगार निर्मितीचा लाभ मिळणार आहे.



उत्पादन क्षेत्रासाठी दुसऱ्या भागातील प्रोत्साहन तिसऱ्या आणि चौथ्या वर्षापर्यंत देखील वाढवले जाईल. पहिल्या भागातील लाभ कर्मचाऱ्यांना आधार ब्रिज पेमेंट सिस्टम वापरून डीबीटी पद्धतीने पेमेंट केले जाईल.

दुसऱ्या भागातील लाभाचे पेमेंट नियोक्त्याला थेट त्यांच्या पॅन लिंक्ड खात्यात केले जाईल अशी पेमेंटची पद्धत आहे.

५० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या ईपीएफओमध्ये नोंदणीकृत आस्थापनांना किमान सहा महिने सतत आधारावर किमान दोन अतिरिक्त कर्मचारी (नवे रोजगार) किंवा ५० किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेल्या नियोक्त्यांसाठी पाच अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावे लागतील. त्यांना तीन हजार रुपये लाभ शासन देणार आहे. जास्तीत जास्त आस्थापना, नियोक्ता, वर्कर, ट्रेड युनियन यांनी या योजनेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करावा. जास्तीत जास्त लोकांना रोजगार द्यावा. पीएफ रजिस्ट्रेशन करावे आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त पुरुषोत्तम मीना यांनी केले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आयुक्तांचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या तसेच घाण करणाऱ्या लोकांवर दंडात्मक कारवाई करा. दंड भरण्यास नकार देत असतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करा, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बैठकीत आरोग्य निरीक्षकांना दिले आहेत.

सोलापूर शहरातील स्वच्छता मोहीम तसेच स्वच्छ सोलापूर-सुंदर सोलापूर राखण्यासाठी महापालिका आयुक्तांनी सोमवारी सायंकाळी महापालिकेत सर्व आरोग्य निरीक्षक मुख्य आरोग्य निरीक्षक यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. त्या बैठकीत आयुक्तांनी हे आदेश दिले आहेत. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

सोलापूर शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच प्रसंगी पोलिसात



गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे सक्त आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी दिले. यावेळी आयुक्तांनी स्वच्छता मोहिमेचाही आढावा घेतला.

सोलापूर शहरात बहुतांश भागात साचलेला तसेच नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी टाकलेला कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असल्याने महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या शहरातील सर्व कार्यक्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेमध्ये दैनंदिन शहर स्वच्छतेच्या कामकाजाव्यतिरिक्त शहरामधील विविध भागामध्ये आढळून आलेल्या कचऱ्याचे ढीग हटविण्यात आले. रस्त्यावर तसेच सार्वजनिक ठिकाणी नागरिकांकडून टाकण्यात आलेला कचरा वाहनांद्वारे संकलित करण्यात आला. या मोहिमेदरम्यान दैनंदिन स्वच्छतेच्या कामकाजानंतर सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व परिसर अस्वच्छ करणाऱ्या नागरिकांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत ही मोहीम यापुढेही अशीच चालू राहणार आहे. सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर व परिसर अस्वच्छ करणाऱ्या नागरिकांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. शहरातील नागरिकांनी शहरात स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

स्वामी विवेकानंद प्रशाला यासह इतर शाळांमध्ये स्वच्छतेसंदर्भात जनजागृती करण्यात आली. अस्वच्छतेमुळे होणारे परिणाम यावर मार्गदर्शन करण्यात आले.

### सोमवारी ६२ टन कचरा संकलित

महापालिकेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये १ ते ७ जुलै दरम्यान सात दिवसांत एकूण ४४१ लोकांवर दंडात्मक कारवाई करून ९८ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. सोमवार, ७ जुलै रोजी एकूण ६२ टन कचरा संकलित करण्यात आला. कचरा साठलेली ४५ ठिकाणे हटविण्यात आली आहेत. त्या ठिकाणी रांगोळी काढून स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूरचा संदेश दिला, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

# 9 जुलै चा देशव्यापी संप पूर्ण ताकदीने यशस्वी करा - कॉ.धनंजय कुलकर्णी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "सुधारणांच्या नावाखाली कामगार कायदे म्हणजेच कामगार संहितासह जनविरोधी आर्थिक धोरणे राबविण्याचा सरकारचा घाट हाणून पाडण्यासाठी येत्या 9 जुलै रोजी देशभरातील सर्व संघटित आणि असंघटीत क्षेत्रातील संघटनांच्या राष्ट्रीय समन्वय समितीने राष्ट्रव्यापी संपाची हाक दिली आहे, त्या संपात अक्ष्एअ या लढावू बँक कर्मचारी संघटनेने सहभाग दिल्याने, एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून हा संप पूर्ण ताकदीने बँक कर्मचाऱ्यांनी यशस्वी करावा," असे आवाहन बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी केले.

लातूर येथील संघटना कार्यालयात आयोजित सभेत संघटना कार्यकर्त्यांना उद्देशून ते पुढे म्हणाले की,"सुधारणांच्या नावाखाली आज नोकऱ्यांचे कंत्राटीकरन घडवून आणले जात आहे.विमा क्षेत्रात शंभर टक्के परकीय गुंतवणुकीला अनुमती देऊन एलआयसी सारख्या विमा कंपन्यांचा खाजगीकरणाचा घाट घातला जातो आहे. मागील अनेक वर्षापासून सार्वजनिक क्षेत्रामध्ये आवश्यक त्या प्रमाणात कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची भरती केली जात नाही.सामान्य लोकांचा पैसा मोठ्या उद्योगपतींना कर्जामध्ये मोठी सूट देण्याकरता वापरला जातो आहे.नव्या कामगार संहितेच्या माध्यमातून कामगारांच्या हातात पुन्हा बेड्या घातल्या जात आहेत.आपल्या कष्टा मधून राष्ट्र उभारणीमध्ये योगदान देणाऱ्या कामगारांना जुन्या पेन्शन ऐवजी नवीन पेन्शन लागू केली गेलेली आहे. सुधारणांच्या नावाखाली कामगार संघटनांच्या हक्कावरती गदा आणली जात आहे. या सर्व जनविरोधी धोरणांचा विरोध करण्यासाठी आज देशभरातील संघटित व असंघटित क्षेत्रातील मिळून दहा कोटी पेक्षा जास्त कामगार या संपामध्ये सहभागी आहेत. सरकारने संपाची गंभीर दखल घ्यावी अन्यथा भांडवलदार धार्जिण्या धोरणांना हाणून पाडण्यासाठी कामगारांना आपला लढा आणखी तीव्र करावा लागेल असा इशारा यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी दिला.

भारतीय स्वातंत्र्यामध्ये सर्व कामगारांनी दिलेला लढा अतुलनीय असा होता. भारतीय स्वातंत्र्यासाठी झगडलेल्या सर्वांचा उद्देश हा केवळ परकीय सत्तांना भारतातून हाकलून देणे इतकाच मर्यादित नव्हता तर त्यासोबतच समताधिष्ठित भारताची निर्मिती करणे ज्यामध्ये कोणाचेही शोषण न होता श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होणार नाही जेणेकरून कामगार, सर्वसामान्य जनता यांचे वेगवेगळ्या ठिकाणी होणारे शोषण बंद होईल व जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्येकास सन्मानाने व स्वाभिमानाने जगता येईल हे स्वप्न पाहून कामगार व अनेक स्वातंत्र्ययोद्धयांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला. 1991 नंतर खाजगीकरण व जागतिकीकरण या धोरणांच्या माध्यमातून सरकार पुन्हा काळाची चाके उलटी फिरवू पाहत आहे. सुधारणांच्या नावाखाली भांडवलदार धार्जिने धोरणे राबवून समाजातील अभिजात वर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

आत्तापर्यंत सार्वजनिक क्षेत्राने लाखो सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या दिल्या आहेत. या देशातील इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राने दिलेले योगदान खूप मोठे आहे. या अमूल्य आणि अफाट योगदानामुळेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम हे देशाचे आधुनिक मंदिरे आहेत.कामगारांनी त्यांची कार्यक्षमता सुधारायला पाहिजे ही गोष्ट कामगार संघटना म्हणून आम्हाला मान्यच आहे परंतु जेव्हा हे पहावयास मिळते की कामगारांच्या वाढलेल्या कार्यक्षमतेमुळे नफा कित्येक पटीने वाढतो परंतु त्याचवेळी कामगारांची वेतन मात्र कमी होताना दिसते याचे आपण कसे समर्थन करणार? असा रोकडा सवाल यावेळी कामगार संघटनांच्या नेत्यांनी सरकारला केला.

या सभेस बँक कर्मचारी संघटना पदाधिकारी कॉ. दीपक माने, कॉ. परमेश्वर बडगीरे, कॉ. सुधीर मोरे, कॉ.रेश्मा भवरे यांचेसह सर्व बँक कर्मचारी उपस्थित होते.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**


**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सुवासिक लाकूड देणारे झाड २) हा चिरताना डोळ्यातून पाणी येते ३) फोटो (हिंदीत) ४) निंदा, **टिपण्णी ५) त्वरेने, लगेच ६) अंतराळ, थोडा अवधी असणे ७) युध्दानंतरची समेटाची बोलणी १०) पिकांचा हिवाळ्यातील हंगाम १३) उत्कर्ष, विकसित होणे १६) फॅक्टरी (मराठीत) १८) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात २०) दहा (हिंदीत) २१) शालेय गाईड पुस्तकांचे प्रकाशन संस्था २२) भारतीय कसोटी टीममधील एक फलंदाज २३) स्वर्गच्या विरूध्दार्थी २६) झेंडा, मंगलसमयी सुशोभित करण्यासाठी या रांगेने लावतात २७) श्रीगणेशाचे वाहन २९) शर्थ ३१) एक भाजी ३२) इंदिरा गांधी यांच्या आईचे नाव ३३) देवतांचे पेय ३४) पात्र, गुणवान ३६) कागदी दस्त्यांचे माप ३७) साईबाबांचा संदेश-*** मालिक एक ३८) मिरवणुकीप्रसंगी हा उधळतात ३९) एक पांढऱ्या रंगाचा पक्षी ४१) पाणी साठवण केलेला मोठा बंधारा ४४) टभ उलट लिहा ४६) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक **

**आडवे शब्द :** १) महाराष्ट्र भाजपचे एक नेते ६) राज ठाकरे यांच्या मुलाचे नाव ८) नोकर, गुलाम ९) कावळ्याचे ओरडणे १०) मावळ्यांची घोषणा- ** हर महादेव १२) आकाश १४) पाच गुणिले चार १५) चुलत्यांना या नावाने संबोधतात १७) ताणला जाणारा लवचिक पदार्थ १८) पलीकडे, पल्याड १९) राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष (फक्त नाव) २१) भन (उलट लिहा) २२) तपासणे, धनादेश (इंग्रजीत) २४) विशेष, स्पेशल २५) श्रीविष्णूचा एक अवतार, डुक्कर २६) लायसन (मराठीत) २८) व्यवस्थित, **नेटके २९) घोडा ३०) दह्यात पाणी मिसळून हे बनवितात ३१) लग्न (हिंदीत) ३२) कापण्याचे साधन (इंग्रजीत) ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा जिल्हा ३५) गोलाकार तळून केलेला खाद्यपदार्थ ३७) वेळ (हिंदीत) ३८) सोनाली कुलकर्णी अभिनीत एक चित्रपट, एक गोड खाद्यपदार्थ ४०) प्रगती, उन्नती ४१) उन्हाळ्यातील एक महिना ४२) एक म्हण-बैल गेला झोपा ** ४३) रवा, शिरा ४४) उजाड माळरान ४५) समुद्राच्या पाण्याची लहर ४७) नदीकाठची लवचिक वनस्पती ४८) पोट (हिंदीत) ४९) श्रावण (हिंदीत)

## सुडोकु - 296

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

